प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी
पदासाठीच्या सर्वसाधारण सेवाशर्ती

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**

शासन निर्णय क्रमांकः प्रविचौ-१२१०/प्र.क्र.६२/१०/११-अ
मंत्रालय,मुबई-३२. दिनांकः-२०नोव्हेंबर,२०१०.

वाचाः-१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रः- एसपीओ-२८०७/प्र.क्र.२१/०७/११-अ दि.२८.१०.०९
२) शासन परिपत्रक क्रः- एसपीओ-२८०७/प्र.क्र.२१/०७/११-अ दि.१५.२.१०

**प्रस्तावनाः-**

राज्य सेवेतील वर्ग-१ व २ मधील अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी महसूल विभाग स्तरावर प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी या पदांची निर्मिती संदर्भ क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली असून सदर पदाच्या सेवा शर्ती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-** विभागीय आयुक्त स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी पदासाठीच्या सेवाशर्ती पुढील प्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

१) **नियुक्तीः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी या पदावर सामान्य प्रशासन विभाग,का.११-अ यांच्यामार्फत बदलीने नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात येईल. उप सचिव व समकक्ष अथवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या राज्य शासकीय अधिकाऱ्यांची या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येईल.

२) **बदलीः-** या पदावर नियुक्त अधिकाऱ्यांना बदलीच्या कायद्यातील सर्वसाधारण तरतूदी लागू राहतील.

३) **वेतन व भत्तेः-** या पदावर नियुक्त होणारे अधिकारी ज्या वेतनश्रेणीत कार्यरत असतील त्या वेतनश्रेणीनुसार त्यांना देय असलेले वेतन व त्यांच्या मुख्यालयाच्या शहराला अनुज्ञेय असलेले इतर भत्ते प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती नंतर देय राहतील.

४) **रजाः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी या पदावरील अधिकाऱ्यांना नैमित्तिक,अर्जित किंवा वैद्यकीय रजा मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना राहतील.

५) **गोपनीय अहवालः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी या पदावर कार्यरत अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन संबंधित महसूल विभागाचे विभागीय आयुक्त करतील. तर,पुनर्विलोकन अ.मु.स./प्र.स.(सेवा),सामान्य प्रशासन विभाग हे करतील. त्यानंतर सदर गोपनीय अहवाल ज्या प्रशासकीय विभागामार्फत हे अधिकारी बदलीने नियुक्त झाले असतील त्या सेवा उसन्या देणाऱ्या विभागाकडे सामान्य प्रशासन विभाग, का.११-अ यांचेकडून पाठविण्यात येतील.

प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचारी त्यांच्या नियंत्रणाखाली असतील अशा कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी हे प्रतिवेदित करतील व पुनर्विलोकनासाठी संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करतील.

29 NOV 2010

E:Kundye.lwp

६) **नियंत्रक अधिकारीः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी हे मुख्यतः सामान्य प्रशासन विभाग यांच्या नियंत्रणाखाली राहतील व विभाग स्तरावर या पदावरील अधिकाऱ्यांचे नियंत्रक अधिकारी म्हणून संबंधित महसूल विभागाचे विभागीय आयुक्त हे राहतील.

७) **कागदपत्रे स्वीकारणे व परत करणेः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे चौकशीसाठी प्राप्त झालेली कागदपत्रे तपासणी करून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी त्यांची राहील. तसेच,विभागीय चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर चौकशी अहवालासह सर्व मूळ कागदपत्रे संबंधित कार्यालय/प्रशासकीय विभाग यांच्याकडे सुपूर्द करून त्याची पोच घेऊन ठेवणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

८) **कागदपत्रांची जबाबदारीः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांनी स्वीकृत केलेली कागदपत्रे त्यांच्या ताब्यात असताना गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर राहील.

९) **विहित मुदतीत चौकशी पूर्ण करणे :-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणारी विभागीय चौकशीची प्रकरणे विहित मुदतीत चौकशी पूर्ण करून चौकशी अहवाल सादर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील.

१०) **चौकशी प्रकरणास मुदतवाढ घेणेः-** अपरिहार्य कारणास्तव एखाद्या प्रकरणात विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित प्रकरणी संबंधित कार्यालय/विभाग यांच्यामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडून मुदतवाढ घेणे आवश्यक राहील.

११) **सेवानिवृत्ती विषयक लाभः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी या पदावर नियुक्त झालेले अधिकारी त्याच पदावरून सेवानिवृत्त होत असतील तर त्यांचे उपदान,देय असल्यास अर्जित रजा रोखीकरण व अन्य सेवानिवृत्तीविषयक लाभ देण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडून करण्यात येईल.

१२) **इतर सेवाशर्तीः-** प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी या पदावर कार्यरत अधिकाऱ्यांच्या इतर सर्व सेवाशर्ती महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार विनियमित होतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra. gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे व त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१०१०२६१४२४२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

२०।११।१०

(पां.जो.जाधव)

उप सचिव,महाराष्ट्र शासन,

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,

E:Kundye.lwp